# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

**विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०६.११.२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत**

दिनांक ०६.११.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक पार पडली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मधुकर गायकवाड | : | मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा अध्यक्ष |
| २. | श्री. एस. व्ही. पोटरे, कार्यासन अधिकारी, मंत्रालय, मुंबई. | : | शासन प्रतिनिधी |
| ३. | श्री.एस.बोरसे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वांद्रे, मुंबई. | : | शासन प्रतिनिधी |
| ४. | श्री. एन.एम. अहमद | : | कल्याण उपायुक्त, भारत सरकार. |
| ५. | श्री. अनिल ढवळे | : | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. प्रकाश देवतळे | : | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री. रमेश सारडा | : | मालक प्रतिनिधी |
| ८. | श्री. महेश मुद्दा | : | मालक प्रतिनिधी |
| ९. | श्री. मुनवर शेख | : | कामगार प्रतिनिधी |
| १०. | श्री. राजेश फुले | : | कामगार प्रतिनिधी |
| ११. | श्री. दादाराव डोंगरे | : | कामगार प्रतिनिधी |
| १२. | श्रीमती राधिका गायकवाड | : | कामगार प्रतिनिधी |
| १३. | श्री. आर.व्ही. कुलकर्णी | : | कामगार उप आयुक्त, मुंबई |
| १४. | श्री. आर.एम.भिसले | : | सरकारी कामगार अधिकारी, मुंबई |

सर्वप्रथम मा. अध्यक्षांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.१ : मागील बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी देणे.**

सुरुवातीस मागील दि. ०७.१०.२०१२ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तांतास मंजूरी देण्याकरिता वाचन करण्यात आले. त्यास अनुसरुन मा. अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, मागील वेळेस सर्व सदस्यांना ठराव वाचून दाखवून घेतलेले आहेत. त्यामुळे यावेळेस त्यात काही बदल असतील असे वाटत नाही. त्या अनुषंगाने श्री. महेश मुद्दा यांनी असे प्रतिपादन केले की, बांधकाम कामगारांच्या घरबांधीसाठी जे अर्थसहाय्य मंडळाकडून दिले जाणार आहे, त्याचा स्तर निश्चित करण्यात यावा. त्यास सर्व सदस्यांनी पाठिंबा दर्शविला. ०२-०३ जिल्ह्यांचा अभ्यास केला असता, घरकुल योजनेचे नियमन करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना लाभार्थी ठरविण्याचे अधिकार आहेत. बऱ्याचशा राज्यातून अशा प्रकारची कार्यवाही अवलंबिली जाते. उदा. छत्तीसगड व आंध्रप्रदेश. त्या अनुषंगाने श्री. राजेश फुले यांनी मागील इतिवृत्तांतातील ठराव क्र. ०१ मध्ये **"नोंदीत इमारत व इतर बांधकाम कामगाराला घरकुल योजने अंतर्गत घर बांधण्यासाठी प्रत्येकी रु. २ लाख सरसकट अर्थसहाय्य म्हणून देणे"** आहे. त्यात **"नोंदीत इमारत व इतर बांधकाम कामगाराला घरकुल योजने अंतर्गत घर दुरुस्तीसाठी प्रत्येकी रु. १.५० लाख सरसकट अर्थसहाय्य म्हणून देणे"** अशी दुरुस्ती सुचविली.

श्री. दादाराव डोंगरे यांनी असे सांगितले की, बैठकीच्या काही दिवस आधी सर्व सदस्यांना मागील बैठकीचे इतिवृत्तांत व विषयसूची प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने सविस्तर अभ्यास करुन चर्चा करणे सोईचे होईल व त्याबाबतचे प्रस्तावही सदस्यांकडून मागविण्यात यावेत, असेही त्यांनी सुचविले. तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांनी मंडळास सादर केलेल्या २२ मुद्दयांच्या अनुषंगाने कोणतीही चर्चा झालेली नाही. त्यावर मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, श्री. डोंगरे यांनी मंडळास सादर केलेल्या २२ मुद्दयांच्या छायांकित प्रती सर्व सदस्यांना वितरीत करण्यात याव्यात.

दिनांक १७.१०.२०१२ विषय क्र. ३ मधील ओळ क्र. ९ येथे **"बैठकीच्या दिवशी रु. १,५००/- भत्ता"** या शब्दाच्या ऐवजी **"बैठकीच्या एक दिवस अगोदर, बैठकीच्या दिवशी आणि एक दिवस नंतर"** अशी दुरुस्ती करण्याचे श्री. फुले यांनी बदल सुचविले. तसेच सदरची दुरुस्ती वारंवार करण्यास सांगितले असतादेखील ती दुरुस्ती होत नसल्याबाबत श्री. फुले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पुढे श्री. फुले यांनी सुचविलेल्या दुरुस्तीनुसार इतिवृत्तांतात बदल करण्यात आला.

तसेच कौशल्यवृद्धीच्या मुद्दयाच्या अनुषंगाने मा. अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, स[illegible] औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सर्व प्रकारचे कोर्स घेण्याची क्षमता नाही. काही ठिकाण[illegible]

शासनमान्यताप्राप्त खाजगी प्रशिक्षण संस्थेद्वारे कोर्स घेण्यात येत आहे. त्यानुसार शब्दप्रयोगामध्ये दुरुस्ती करण्यात यावी. यास अनुसरुन श्री. डोंगरे यांनी सौंदर्यशास्त्राचे प्रशिक्षणही द्यावे, असे सुचविले.

मागील बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्र. ०५ च्या अनुषंगाने श्री. डोंगरे यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळामार्फत उपकराची जी गुंतवणूक केली जाते, त्याचा आजपर्यंतचा तक्ता तसेच उपकर जमेचा तक्ता सर्व सदस्यांना मिळावा. त्यास श्री. फुले यांनी दुजोरा दिला. त्यावर मा. अध्यक्षांनी गुंतवणूकीबाबतच्या उपसमितीचे सदस्य व मंडळाचे सचिव यांनी चर्चा करुन त्याबाबत कार्यवाही करावी व मंडळास त्याबाबत अवगत करावे.

२. **मंडळाची जाहिरात देणे**.

मा. अध्यक्षांनी पुढे असे सांगितले की, सार्वजनिक ठिकाणी जाहिराती प्रसिद्ध करण्याच्य शासनाच्या काही एजन्सीज आहेत. अशाच एका एजन्सीकडून मंडळाकडे काही प्रस्ताव NSIC व MSSIDC या शासकीय संस्थांकडून जाहिरातीचा नमुना प्राप्त झाला आहे. सदर नमुन्याची स सदस्यांनी पहाणी करुन त्यात काही दुरुस्त्या असल्यास सुचवाव्यात व मान्यता द्यावी. सद जाहिरातीचे अवलोकन करुन उपस्थित सदस्यांनी महाश्रमच्या लोगोच्या ठिकाणी मंडळाचा लोग असावा, अशी दुरुस्ती सुचविली. तसेच मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री यांचा फोटो छापण्यात यावा. त्य अनुषंगाने जाहिरात देण्याकरीता उपसमिती गठीत करण्यात आली. सदर समितीमध्ये श्री. प्रका देवतळे, श्री. राजेश फुले व श्रीमती राधिका गायकवाड यांचा समावेश असेल व सदरचे समिती अध्यक्ष मा. कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ राहतील.

जाहिरात प्रसिद्ध करताना प्रामुख्याने, बस स्थानके, सार्वजनिक स्थळे, कामगार आयु कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच बांधकामच्या मोठ्या साईटस्, इ. ठिकाणी लावण्यात याव्या त्यावर मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, जवळ जवळ सर्व एस.टी. मुंबईत येतात. त्यामुळे एस.टी.व जाहिराती प्रसिद्ध करणे जास्त योग्य होईल. तसेच ७५० एस.टी.वर जाहिराती प्रसिद्ध करण्याकरी रु. ०१ कोटी ६३ लाख इतका खर्च येईल व सदरची जाहिरात पुढील ०६ महिने प्रसिद्ध होईल. त्य

अनुसरुन श्री. डोंगरे यांनी जाहिरातींना विभागानुसार प्रसिद्धी देण्यात यावी, असे सुचविले. त्या अनुषंगाने श्री. राजेश फुले यांनी सदर जाहिरातींकरीता करोडोंचा खर्च येणार असल्याने, त्याचा अभ्यास करण्याकरीता निवड केलेल्या समितीला वेळ देण्यात यावा, असे सांगितले. उपसमितीने जाहिरातीची व्यापकता ठरविण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. व्यापक प्रसिद्धी एस.टी. बसेस व सार्वजनिक स्थळे तसेच कार्यालयांच्या ठिकाणी मान्यताप्राप्त संस्थेकडून विहित पद्धती अवलंबून जाहिराती देण्याचा सर्वानुमते ठराव झाला.

## ३. बांधकाम कामगारांच्या नोंदणीबाबतचा आढावा घेणे.

तसेच नोंदणीच्या संदर्भात मा. अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, आतापर्यंत ७१,०७३ बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली असून, त्यामध्ये वाढ करण्याकरीता जे-जे प्रयत्न करावे लागतील ते सर्व करण्यात यावे. माहे नोव्हेंबर, २०१२ पर्यंत ५०,००० बांधकाम कामगारांची नोंदणी व्हावयास पाहिजे. त्या अनुषंगाने श्री. दादाराव डोंगरे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १,६०० बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी बऱ्याच प्रमाणात नोंदणी बेकायदेशीर असल्याची माहिती प्राप्त झालेली आहे. त्यावर मा. अध्यक्षांनी मंडळाचे सदस्य-सचिव व श्री. दादाराव डोंगरे यांनी स्वतः कोल्हापूर येथे जाऊन मंडळाच्या खर्चाने सदर नोंदणीची तपासणी करावी, असे सुचविले. बांधकाम नोंदणीबाबत मागील बैठकीत असे ठरले होते की, धरण व कालवे, इ. ठिकाणी काम करणाऱ्या म.न.रे.गा.च्या कामगारांनाही बांधकाम कामगार म्हणून नोंदीत करुन घ्यावे. त्या माध्यमातून आपल्या ०२ ते २.५० लाख कामगार मिळू शकतील. तसेच त्याबाबतची माहिती भारत सरकारच्या वेब साईटवर उपलब्ध आहे. तसेच न.रे.गा.चे जे कामगार आहेत त्यांना नोंदीत करुन घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांना सहभागी करुन घ्यावे लागेल. त्या अनुषंगाने श्री. बोरसे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, न.रे.गा.ची सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच काल कोणत्या कामगाराने किती पगार घेतला, याबाबतची माहितीही तेथे उपलब्ध आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांना सहभागी करुन घ्यावे, असे सुचविले. तद्नंतर श्री. प्रकाश देवतळे यांनी असे प्रतिपादन केले की, काही ठिकाणी प्लान्टचे कामकाज सुरु आहे. आज दिनांकास इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण अधिनियमान्वये नोंदणीकरीता दोन ठिकाणी सहाय्यक कामगार आयुक्त यांना पत्रदेखील दिलेले आहे. त्यावर असे तोंडी सांगण्यात आले की, सद

काम हे भारत सरकारच्या अखत्यारीतील असल्याने तेथील कामगारांची नोंदणी करता येणार न
त्यावर श्री. एन.एच. अहमद, कल्याण उपायुक्त, भारत सरकार यांनी असे सांगितले की, जरी सद
काम हे केंद्र सरकारच्या अखत्यारीतील असले तरी तेथील कामगारांचीदेखील नोंदणी करता :
केंद्र सरकारपुरस्कृत आस्थापनांच्या चालू असलेल्या बांधकामांवरील बांधकाम कामगारांची नों
इमारत व इतर बांधकाम अधिनियमांतर्गत होत नसल्याचे श्री. फुले व श्री. देवतळे यांनी निदर्श
आणल्यावरुन सदरच्या बाबीवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव : **केंद्र शासनाच्या प्रकल्पांवर काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची नोंदणी करणे व त्य मंडळाचे लाभ देण्यात यावेत. याबाबत मंडळाचे प्रतिनिधी असलेल्या श्री. प्रकाश बेंजामिन, कल्य आयुक्त, भारत सरकार यांनी मंडळाच्या सदस्यांना पूर्णतः सहकार्य करतील.**

**सूचक** :- श्री. प्रकाश देवतळे

**अनुमोदक** :- श्री. राजेश फुले.

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

४. लाभार्थ्यांच्या अर्जांना मंजुरी देणे.

मंडळाकडे आलेल्या अर्जापैकी १२ लाभार्थी पात्र असल्याबाबतची माहिती श्री. भिर सरकारी कामगार अधिकारी यांनी दिली. प्राप्त झालेल्या सर्व लाभार्थ्यांच्या अर्जांना सर्वानुमते मं देण्यात आली. तसेच श्री. कुलकर्णी, सदस्य-सचिव यांनी अशी सूचना केली की, शालेय विद्यार्थ्य रु. ५०/- दरमहा जो भत्ता दिला जातो, त्याऐवजी शैक्षणिक वर्षाअखेरीस एकत्रित रु. ६००/- उपस्थि भत्ता म्हणून दिल्यास लाभर्थ्यांच्यादृष्टीने जास्त योग्य होईल, व सदर सूचनेस सर्व उपस्थित सदस्य मंजूरी दर्शविली.

ठराव - **मंडळाने विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत केलेल्या नियमाला अधीन राहून उक्त १२ अज मंजुरी देण्यात येत आहे.**

**सूचक** :- श्री. महेश मुद्दा

**अनुमोदक** :- श्री. प्रकाश देवतळे

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

५. **वैद्यकीय लाभ योजनेवर नव्याने निर्णय घेणे.**

मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, मंडळाची लाभांची जी यादी प्रसिद्ध झालेली आहे, त्यामध्ये केवळ कॅन्सर, टी.बी. व इतर असा उल्लेख आहे व त्याकरीता रु. १०,०००/- लाभार्थ्यास देण्याची तरतूद आहे. त्यामुळे कॅन्सर व टी.बी. व्यतिरिक्त इतर कोणत्या आजारांचा सदर योजनेमध्ये समावेश करता येईल, याबाबत सुचवावे. त्यास अनुसरुन श्रीमती राधिका गायकवाड यांनी असे सुचविले की, बांधकाम कामगारांमध्ये अर्धांगवायू होण्याचे प्रमाण जास्त असल्याने, सदर आजाराचा योजनेमध्ये समावेश करण्यात यावा. सदर निर्णयास एकमताने मंजूरी देण्यात आली.

६. **मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे विषय.**

१) **नोंदीत बांधकाम कामगारांना बोनस मिळण्याबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत माहिती देताना मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, मार्ज आ. श्री. नरसय्या आडम यांनी मंडळास पत्र देऊन नोंदीत बांधकाम कामगारांना किमा- २०% इतका बोनस या दिवाळीस द्यावा, अशी मागणी केली. तसेच तसे न केल्यार आंदोलन करण्याची बाबही त्यांनी नमूद केलेली आहे. त्यास अनुसरुन सर्व उपस्थितांनं मंडळास बोनस देण्याचे अधिकार नसल्याचे व तशी अधिनियमात तरतूद नसल्याचेहं सांगितले. तसेच सदर बाब श्री. नरसय्या आडम यांना कळविण्यात यावे, अ- मा. अध्यक्षांनी सांगितले.

२) **मंडळ सदस्य व बिल्डर असोसिएशन यांची बैठक आयोजित करणे.**

श्री. महेश मुद्दा यांनी महाराष्ट्र बिल्डर्स् असोसिएशन व मंडळाचे सदस्य यांची बैठ आयोजित करण्यात यावी, जेणे करुन बांधकाम नोंदणी व लाभार्थ्यांना लाभ देण्याची ब सर्व बिल्डर्सपर्यंत पोहोचेल व त्याचा फायदा मंडळाच्या बांधकाम कामगार नोंदणीकरी होऊ शकेल, असे सुचविले. तसेच सदर कार्यशाळा/प्रशिक्षणाकरीता प्रत्य अंमलबजावणी करणारे कामगार उप आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त व सरक कामगार अधिकारी यांनादेखील पाचारण करण्यात यावे. तसेच विविध बांधक कामगार संघटनांचे प्रतिनिधी यांनाही बोलाविण्यात यावे. अंदाजे २०० निमंत्रितांची अपे

ठेवून त्याकरीता एखाद्या चांगल्या हॉटेलची सोय करण्यात यावी. तसेच सदर कार्यक्रमाच्या प्रसिद्धीकरीता शासकीय वाहिन्या व पत्रकारांना आमंत्रित करण्यात यावे. सदर कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाकरीता मा. मुख्यमंत्र्यांना बोलाविण्यात यावे. या कार्यक्रमास येणारा सर्व खर्च मंडळाने सहन करावा, असेही सुचविले. त्यावर मा. अध्यक्षांनी सदर कार्यक्रमाची जबाबदारी श्री. महेश मुद्दा यांना सोपविली व त्याबाबतची आखणी श्री. मुद्दा यांनी इतर सदस्यांशी चर्चा करुन करावी, अशा सूचना दिल्या.

३) **स्वावलंबन पेन्शन योजना.**

स्वावलंबन पेन्शन योजनेविषयी अध्यक्षांनी पुन्हा चर्चा सुरु केली. सदर योजना मर्यादित स्वरुपात सुरुवात म्हणून ज्या नोंदीत कामगारांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त व ५४ वर्षापर्यंत आहे, त्यांना प्राधान्याने पहिल्या वर्षी सुरु करण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच कल्याणकारी योजनेअंतर्गत विविध योजनांची चर्चा झाली व त्यात कामगारांच्य आरोग्याच्यादृष्टीने आवश्यक मच्छरदाणी देण्याबाबत चर्चा होऊन, सुरुवात म्हणून २,००० औषधोयुक्त मच्छरदाण्या उपलब्ध करुन आवश्यकतेनुसार वाटप करण्याचा सर्वानुमते ठराव झाला.

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

**कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याण मंडळ,**
**महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई.**

*****